म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय : आ. वा
दा. क्र. : ९०५८

BVBK-0401959

११।३।८६

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र ...१९५९ दिनांक ११.३.८६
विषय ...बा.वा... क्र. ........

# वीतभर तळ्यात हातभर मासा

(बालांसाठी अद्‌भुत कथा)

मालती दांडेकर

BVBK-0401959

अतुल बुक एजन्सी पुणे ३०.

प्रकाशक :
अतुल बुक एजन्सी
ना. गो. जोशी
३१७, नारायण पेठ,
दै. 'प्रभात' समोर,
पुणे ४११ ०३०.

मुद्रक :
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ,
नागनाथपाराजवळ,
पुणे ४११ ०३०.

© मालती दांडेकर

मुखपृष्ठ : जोशी आर्टस

प्रथमावृत्ती : एप्रिल १९८४

मूल्य ८ रुपये

चि. श्रेया पागनीस व चि. ऋचा भंडीवाद
या माझ्या दोन्ही छोट्या पणतींना-
अर्पण.

मालती दांडेकर

## अगदी थोडेसे हितगुज–


हे पुस्तक मी खास सात ते नऊ वर्षांच्या मुलांमुलींसाठी आवर्जून लिहिले आहे. या वयात मुलांना भोवतीच्या व इतर प्राण्यांविषयी किती कुतुहल असते ! त्यांच्या मजेदार गोष्टी त्यांना फार आवडतात, याचा मी, स्वत: छोटुकल्यांना अशा गोष्टी सांगून वारंवार अनुभवही घेतला आहे. मुले या गोष्टी वाचून खदखदून हसली, खूष झाली, की ह्या कथा लिहिल्याचे चीज झालेच ! बालवाचकांचे समाधान, यापेक्षा आम्हाला तरी आणखी काय हवे ?

या कथांची निवड मी पंचतंत्र, इसापनीती व अशीच इंग्रजीतील इतर देशीय बालकथांची पुस्तके यांतून केली आहे. अर्थात भाषा जुळणी-मांडणी वगैरे सारी माझीच. मी लहान मुलांना जशा गोष्टी सांगते, त्याच पद्धतीने याही कथा लिहिल्या आहेत. या छोटया पुस्तकाचे प्रकाशक श्री. जोशी हे बोलून चालून उत्तम चित्रकार ! त्यांच्या सुरेख चित्रांचा साज या कथांना लाभला– म्हणजे दुधात साखरच पडल्यासारखेच ते !

B–9 Staff Colony,
M. R. E. कॉलेज
जयपूर २०३००४.

मालती दांडेकर

क्र. २८५८ दिनांक ११:३:८६
विषय बा.वा. क्र.



# ससा छोटा— पण बुद्धीने मोठा

खरे म्हणजे ते मोठे अरण्य असले, तरी सध्या तेथे राजा कोणी नव्हता. वनराज सिंह महाराज अतिशय वृद्ध होऊन नुकतेच मरण मावले होते व त्यानंतर त्या अरण्याचा राजा कोण असावा याची चर्चा रात्रभर चालू असायची. वाघ मनात विचार करीत असे, की मी सिंहराजांचा मावसभाऊ, तेवढाच ताकदवान, शिवाय राजा कसा प्रजेला धाकात ठेवणारा असायला हवा ना ? ण सिंहदादांना अति उग्रपणा जमत नसे. मी म्हणाल तर रान दरून जाईल एवढी मोठ्याने गर्जना करतो व माझी शक्तीही फाट आहे. मी चांगला उग्र आहे, प्रजेला मुठीत ठेवणारा, हे ्यात मुख्य, तर माझीच निवड राजा म्हणून होणार, हे

नक्कीच

पण रानातल्या पशूंनी अजून काहीच तसे ठरवले नव्हते किंव जाहीरही केले नव्हते.

एक दिवस वाघ रानातल्या एका दाट झाडीतल्या लहान पाय-वाटेने निघाला होता. समोरून हत्ती संथपणे झुलत झुलत ये होता त्याच वाटेने. समोरासमोर येऊन दोघेही थांबले! व म्हणाला–

"काय रे लठ्ठोबा, इतका उर्मटपणा या रानच्या राजासमोर? खरे म्हणजे हा वाघराज समोर दिसताच तू सोंडेने वंदन करू मला वाट द्यायला हवी होतीस. चल, हो बाजूला!"

थंडपणे हत्ती म्हणाला, "कोण वाघराज? रानचा राज केव्हा झालास? माझा उगीच अपमान करू नकोस. एक सिंह तेवढे मला माहीत आहेत, तुला कोणी राजा केलंय? बाजूला तूच हो. मला जाऊ दे."

वाघ म्हणाला–

"हे तुला माहीत नसलं तर तो तुझा अडाणीपणा. सिंह-राजांच्या पाठीमागे राज्य मलाच मिळणार, हे तुला कळायला हवं होतं– पण देह डोंगराएवढा असला तरी या तुझ्या भल्या मोठ्या डोक्यात बुद्धी मुंगीएवढीच दिसते. नीघ इथून!"

"अरे, पण तुला कशासाठी राज्य देताहेत लोक? कळू दे"

"मी तुम्हा सर्वांत शक्तिमान व उग्र आहे, माहीत नाही

"ऊं! हेच होय? मला वाटतं, शक्तिमान तर मीच आ येथे सगळ्या येथल्या पशूंपेक्षा!"

"नुस्ती शक्ती काय कामाची ? ती तर एकाद्या मठ्ठ रेड्याहीही असते, तुला गर्जना कुठे करता येते माझ्यासारखी ?"

"येते येते ! दूर हो बघू. मला काम आहे–"

"या रानच्या राजाला उर्मटपणाने बोलणाऱ्याला मी मुकाट्यानं जाऊ देणारा मेंगळट राजा नाही ! चल, लाव पैंज !"

"कशाची पैज ? काय, लावलंयस काय उगीच चऱ्हाट ?"

"चऱ्हाट नाही, शर्यत आहे ही. तू गर्जना कर, अन् मीही करतो ! बघू कोणाची रान हादरवून टाकणारी गर्जना आहे ते; अन् पैज अशीतशी नाही. जो हरेल त्याला दुसऱ्याने ठार करावे !"

शांत हत्ती आता मात्र चिडला. तो म्हणाला– "जातो मी आपला परत ! मी मूर्खांच्या नादी लागत नसतो."

"पण मी लागतो ना तुझ्यासारख्या मूर्खांच्या नादी ! हुडुत् ! त्री भागुबाई ! घाबरून पाठ दाखवून चाललास. वा वा वा, केवढा शूरपणा ! पैजेला भितात हत्तीराज–

ही हेटाळणी सहन न होऊन हत्ती वळला व म्हणाला– "मी भिऊन नव्हतो चाललो, कंटाळून परत फिरलो होतो. ठीक, पैज तर पैज– कर गर्जना तू."

"आधी तू कर, जाडोबा ! रान हादरतं का बघू. मग मी."

"नाही. आधी तू–"

"नाही. तूच आधी कर. ऐकायचंय, का फोडू डोकं ?"

हत्तीने तिरस्काराने पाहात म्हटले– "अरे जा ! तू काय रं डोकं फोडणार ? ते सामर्थ्य एकट्या सिंहराजांनाच होते ! पण उगीच वाद नको. मी गर्जना करतो– अन् जातो त–"

"वा ! पैज ? हरलास तर तू आपण होऊन माझ्यापुढे मरा-

यला आलं पाहिजेस, कबूल आहे ना ? पैज कबूल नसेल तर गुडघे टेकून माफी माग माझी–या वाघराजांची, अन् हो चालता."

" नाही. पैज कबूल करतो. तूही कबूल कर ! मी जिंकलो तर सोंडेने तुला उंच उचलून फेकून देईन. मग कुठेतरी मरून पडशील तू, वाघ्या–"

" बघू बघू, करा गर्जना."

हत्तीने जोरात चीत्कार केला. फारसे काहीच घडले नाही. कोल्हे, ससे वगैरे रानातून जात होते, पण हत्ती सुस्वभावी आहे, तो कोणाला मारून खात नाही हे सर्व रान जाणत होते तेव्हा जाणारे-येणारे काही प्राणी त्या गर्जनेला किंवा चीत्काराला घाबरले नाहीत व पळतही सुटलें नाहीत भिऊन. फक्त ससा तेवढा एका मोठा झाडाआड दडून आपल्या माणिकडोळ्यांनी काय चालले आहे या दोन बड्या पशूंचे भांडण, ते पाहात होता.

वाघ कुचेष्टेने म्हणाला,

" हरलास हत्तीबाबा ? एखादा कावळासुद्धा उडून गेला नाही तुमच्या या क्षुद्र तुतारीसारख्या चीत्काराने घाबरून ! पाहिलंत नीट ? आता या रानच्या वाघराजांची गर्जना ऐका जरा."

वाघाने प्रचंड गर्जना केली.

समोरून हरणांचा कळप येत होता. ती हरणे जीव
पळत सुटली. एक माजलेला बैल घाबरून सैरावैरा धावत
दोन घोडे उधळले, बेफामपणे धावत कुठे दूरदूर गेले. बरेच
भिर्र करून उडाले !

हत्तीची मान खाली झुकली. वाघ विजयाने म्हणाला–

" पाहिलास माझा दरारा ? चल, हो मरायला तयार. पैज जिंकली आहे ! कबूल ?"

" कबूल– पण तू मला खरंच मारणार ? मला वाटलं, माझी तू थट्टा करतो आहेस–"

" आम्ही राजे लोक प्रजेची थट्टा करीत नसतो, समजलात का ? चला, गणपतीचं– तुझ्या देवाचं– नाव घे, अन् हो तयार– बलीदानाला !"

आता मात्र हत्तीला उगीच पैज मारली याचा पश्चात्ताप वाटू लागला. आता आपल्याला हा मारणारच हे त्याने ओळखले. तो म्हणाला–

" ठीक ! आठ दिवसांची मुदत द्यावी तुम्ही मला. मी घरी जाऊन बायको-पोरांचा निरोप घेऊन येतो शेवटचाच, आठव्या दिवशी याच वेळी, याच जागी मी येतो मरायसाठी इथे !"

" वा, छान. तू परतच आला नाहीस तर ?"

" वाघा, तुला माहीत असेल, मी वागणुकीला सच्चा अन् वचनाचा पक्का आहे, असा रानभर माझा लौकिक आहे. कुणालाही विचार, मी ठरल्यावेळी येईन !!"

मग वाघाने जास्त चर्चा केली नाही. न जाणो, हत्ती पिसाळला तर कोणालाही आवरत नाही, म्हणतात. हा पिसाळला तर मलाच उंच फेकून देईल खराच. त्यापेक्षा सरळ त्याला घरी जाऊन येऊ द्यावं हे योग्य ! तो म्हणाला–

" ठीक. आम्ही राजे उदार मनाचे असतो, म्हणून मी तुला सोडतो यावेळी. जा ! चालू लाग, जड दगड कुठला ! ठरल्या वेळेला ये मात्र."

मग वाघ उड्या घेत दुसऱ्या रस्त्याने चालता झाला. इकडे हत्तीही उदास होऊन आपल्या रानातल्या वस्तीकडे निघाला होता. हे काय झाले ? आपण कधी कोणाच्या अध्यात ना मध्यात,

या वाघाच्या बोलण्यात कसे मूर्खपणाने अडकलो ? वेड्यासारखी पेज का कबूल केली ? दुर्दैव ओढवले माझे– माझ्या वेडेपणानेच." मनात म्हणत होता तो.

ससा झाडाआडून सर्वच ऐकत होता, पाहात होता. तो थोड्याच वेळात समोर येऊन उभा राहिला व म्हणाला–

"गजूदादा, मी सारं ऐकलं– पाहिलं. अगदी सुरुवातीपासून ते प्रकरण पाहिलंय पैजेचं–"

"माझी चूक झाली– नाही रे ससूल ?"

"होय. मला वाटतं, तुम्ही त्या उर्मट वाघोबाला उत्तरच द्यायचं नव्हतं, किंवा दुसरं– एकदम हल्ला करून त्याला सोंडेत गुंडाळून दूर कुठे फेकून द्यायचं होतं ! अहो, आडमुठ्याशी वाद कोणी घालतं का कधी ? तुम्ही कशाला घातलात तो उगीच ?"

"पण त्यानं मला डिवचलं, चिडवलं, मला भित्री भागुबाई म्हटलं. मग मी खवळलो–"

"अन् ती वेड्यासारखी पैज कबूल केली ! तोच तर त्याचा डाव होता. बरं, झालं ते झालं– आता ?"

"आता मरणाला मिठी घालायला जायचं, दुसरं काय ? वचन तर पाळलं पाहिजे ?"

"होय, वचन पाळूनही तुम्हांला या मूर्ख पैजेतून वाचवण्याचं काही पाहिलं पाहिजे मला. गजूदादा, सगळ्या रानातल्या आम्हा छोट्या मंडळींना तुम्ही वडीलधारे वाटता, आधाराला हवे आहात तुम्ही आम्हाला–"

"ते खरं, पण इलाज काय ? कोण वाचवील मला यातून ?"

"मी ! मला सुचली आहे एक झकास युक्ती– मात्र मी सांगेन तसं वागलं बोललं पाहिजे तुम्ही. मी इतरांनाही सांगून ठेवतो

साह्य करायला तुम्हाला मला–"

"माझे मित्र– इतर गरीब पशू. चला, मी तुम्हाला युक्ती सांगतो तसं वागाल तर वाचाल तुम्ही, नक्की."

"मग मी जरूर तसा वागेन. उगीच मरण कोणाला छोटू सशा? चल घरीच, तिथंच बोलू या."

मग ते दोघं दूर रानात गेले.

मग त्या आठ दिवसांत सशाने आपल्या बेतास सर्व रानटी पशूंची संमती मिळवली होती व हत्तीस बेत नीट समजावून दिला होता–

आठ दिवस उलटले. ठरल्यावेळी हत्ती खाली मान घालून उदासपणे रानात निघाला होता. सशाची युक्ती छानच होती व त्यामुळे हत्ती त्या दुष्ट वाघाच्या तावडीतून बहुतेक सुटणार होता. सशाने एक मोठा व्यूहच रचला होता म्हणा ना? पण त्यास रानातले सारे पशू साहाय्य करणार होते. फक्त माकडाला तेवढे सशाने आपल्या मित्रमंडळीत घेतले नव्हते. माकड हे टवाळी करणारे व खोडकर स्वभावाचे, त्याचा विश्वास त्याला वाटला नाही. सशाच्या युक्तीप्रमाणे आज त्या रानात गडबड सुरू झाली होती. चहूबाजूंनी पशू धावपळ करीत होते व विजयाच्या आरोळ्या उठत होत्या– वाघ जिभल्या चाटीत हत्तीच्या भरपूर मांसाची मेजवानी करण्यासाठी येत होता. त्याला त्या आरोळ्या, जयघोष, व जयगीत ऐकू आले– हे काय नवीन रानातच आज? तो ते जयगीत नीट ऐकू लागला–

"महाराज ससोजीराजांचा विजय असो!!"

"माणिक डोळ्यांचे!"

"शुभ्रदेहाचे!"

“ वायुवेगाचे!”

“ सुंदर रूपाचे!!”

“ वरिष्ठ बुद्धीचे !”

“ [illegible]रानचे राजे श्रीमंत ससोजी– येत आहेत !”

“ ते महान हत्तीला जिंकून त्यावर बसून येताहेत !”

“ ते वाघाचा चट्टामट्टा करणार आहेत !”

“ तेव्हा धावा ! पळा, जीव वाचवा !”

रानातून सैरावैरा धावत वरीलप्रमाणे ओरडा करीत गाय, हरीण, म्हैस, शेळचा, रेडा, घोडा सगळेच भीतीने धावत होते– व हाही सशाच्या नाटकाचाच एक भाग होता. ते ओरडणे वाघाने ऐकले. हे कोण ससोजी महाराज ? तो क्षुद्र टीचभर ससुड्या तोच की काय ? तो कसला या मोठ्या रानचा राजा ? काय सारे मूर्खाप्रमाणं ओरडताहेत ? ह्या क्षुद्र राजाला म्हणावं, ये पुढे– एक पंजा मारून निकालच लावतो तुझा...”

तेवढ्यात दुरून त्या वाटेने हत्ती वापडा मरणाच्या जागी वेळेवर येतो आहे असे वाघाला दिसले. अरेच्या, पण हे काय ? खरेच की ! या महा अवजड अन् शक्तिमान हत्तीच्या डोक्यावर ससा कसा बसला ? आणि खातोय काय ससा ? बाप रे लाल-लाल काहीतरी ! हत्तीच्या डोक्यातून रक्त वाहातंय की काय ? डोक्याचं मांस तर कुरतडून खात नाहीये ना हा दुष्ट ससूड्या ? तेच– तसंच– होय तसंच आहे–”

आणि हीही सशाची एक युक्ती होतीच. त्याने लाल टमाटे व बीटरूटचे लाल तुकडे हत्तीच्या डोक्यावर पसरले होते व तो केळीही खात होता खुशाल ! हत्ती दुःखाने एकेक पाऊल पुढे येत होता वापडा...

ह्या नाटकाने मात्र वाघ घाबरला. ससा लहान असला तरी रानात सर्वांत शहाणा व युक्तिबाज म्हणून प्रसिद्धच होता. कोणी सांगावे ? शक्तीपेक्षा युक्तीनेही लोक दुसऱ्यांना जिंकतात ! होय, तसेच झाले असणार ! आमचे सारे रान त्याचा जयघोष करीत एरवी कसे उठेल ?

एकदम वाघ दचकला. सारेच रानचे पशू एक झाले तर आपण कितीही शक्तिमान असलो तरी ते आपला फडशा पाडतील ! एकजुटीचे बळ केवढे मोठे असते ! ते इतके अन् मी एकटा–परत जावे का ?

वाघ हे मोठ्यानेच बोलला तशी एका झाडावरून माकडाने ताड्कन् उडी घेतली व म्हटले–

" वाघदादा, घाबरता काय एवढे शूर असून ? तुम्ही एकटे नाही, मी तुमच्या बाजूचा आहे. चला, आपण जाऊ पुढे."

" पण तो द्वाड ससा बघ, हत्तीच्या टाळक्याचं मांस खातोय खुशाल अन् हत्ती मुकाट्यानं चालला आहे. लालभडक मांसाचे तुकडे डोक्यावर पसरलेत. पाहतोस ना ?"

माकड खि: खि: करीत दात विचकून हसले व म्हणाले–

" वाघदादा, ते आहेत बीटचे तुकडे अन् तो खातो आहे केळी, मांस नव्हे– चला लढायला."

" छान माकडा, मी तुला हत्तीच्या मांसाचं जेवण देईन पण तू शेवटपर्यंत मला सहाय्य करशील का लढाईत ? तुम्ही माकडं केव्हा हुप् करून झाडीत पळाल, समजत नाही."

" छे छे, वाघदादा, तुम्हाला कसा विश्वास वाटत नाही माझा ? शेवटपर्यंत आपण दोघं बरोबर राहू. हवेतर असे करू या का ?

आपली शेपटे एकमेकांना घट्ट बांधून टाकू– मग तर खात्री होईल. मी तुमच्याबरोबरच राहणार आहे, याची ?"

" हां, हे ठीक."

खरेच, मग त्या दोघांनी शेपटांची घट्ट गाठ मारली व ते हत्तीकडे येऊ लागले. ते दोघे दिसताच चतुर सशाने ओरडून म्हटले–

" वा वा, माकडराव, तुम्ही कबूल केलं होतं त्याप्रमाणे या उर्मट वाघाला बांधून माझ्यापुढे आणले ? शाब्बास ! तुम्ही माझे विश्वासू प्रधान व्हाल. फार चांगली सेवा केली माझी– सर्वांत जास्त धन्यवाद. बुद्धिमंत राजाला प्रधानही असा चतुर हवा–"

आता मात्र वाघाचा धीर सुटला. माकडाने गोड बोलून मुद्दामच आपल्याला शेपूट बांधून येथे आणले म्हणायचे ? अरे चोरा, गोड बोलून असं फसवतोस काय ? एकदम वाघाने पाठ फिरवली व बारा हात लांब उड्या घेत तो दाट रानात पळाला ! बापडे माकड, त्याच्या बरोबर शेपूट बांधले असल्याने लडखडत ठेचकाळत रानातून फरफटत ओढले जात होते. त्याला कितीक ओरखडे उमटले, शंभर जागी खरचटले. व जरा वाघ उभा राहिला तशी शेपटाच्या गाठी सोडून माकडाने अशी उंच उडी झाडांत घेतली की, बस् बस्.

अन् वाघ ? तोही या फजितीने शरमून दूर कुठे दुसऱ्या अरण्यात चालता झाला. त्याला परत कुणी तेथे पाहिले नाही, आणि अशा प्रकारे सशाच्या युक्तीने सज्जन हत्तीचा जीव वाचला. हत्ती प्रेमाने म्हणाला–

" गड्या सशा, तुला आता केव्हाही मी डोक्यावर बसवून फिरवून आणीन नरं का. फार युक्तिवान अन् शहाणा आहेस


खराच तू. कसे उपकार फेडू ?"

" ऊं, उपकार कसले, हत्तीदादा ! तुम्ही आमचे आहात, तेव्हा जमेल ते केलं पाहिजेच असं तुमच्या करता." असे म्हणत सशाने रानात धूम ठोकली.

हत्ती आनंदाने घरी निघाला होता.

* *

म. ग्रं. सं. ठाणे, [illegible] शाखा.
बाल [illegible] विभाग
दा. क्र. १९५८ दिनांक ११.३.
विषय [illegible] क्र..........



# वीतभर तळ्यात हातभर मासा !

ते तसे छोटेसेच तळे होते. निळे भोर दिसायचे. काठावर लावलेली झाडे त्या तळ्यावर छत्रीसारखी सावली धरून उभी आहेत असे वाटे. छोटी रंगीबेरंगी रानफुले तळ्याच्या काठी आपोआप उगवलेली. जशी काही वनदेवतेने वाटोळ्या तळ्याभोवती रंगीत फुलांची रांगोळीच काढली आहे !

अशा त्या शांत तळ्यात काही मासे राहत होते, लहान-लहानसे होते, पण त्या सर्वांत एक मासा मोठा व खरेच सुंदर दिसणारा होता. त्याचे शेपूट इतके डौलदार होते की, पाण्यातून

जलपरीच फिरतेय जशी असे वाटावे ! रंग सुंदर निळा निळा ! सुंदर चकाकणारे खवले, गरगरीत छानदार डोळे ! सर्व माशांनी त्याला या त्याच्या गुणांनी आपला राजा नेमले होते. इतके मोठे चमकदार डोळे, अशी झळझळीत कांती होती कुणाला तिथे ? तो मासा खरेच राजमासा शोभून दिसणारा होता–

होय ! रूप होते, सुंदरपणा होता, डौलदार बांधा होता, पण हे सारे असले म्हणून गर्व किती करावा, याला काही सीमा ? गुण असले, की गर्व केलाच पाहिजे, असं थोडंच आहे ? पण राजमाशाला ते कोण सांगणार ? तेवढे धैर्य त्या छोटया माशांत कुणालाच नव्हते.

नित्य राजमासा गर्विष्ठपणे म्हणे– "ए काळुंद्रया माशा, दुरून चाल ! शी शी ! काय हा काळा रंग ! मला तुझा रंग चिकटेल !"

"एऽ ! तुम्ही सारे माझे नोकर ! मला खायला तुम्हीच आणून दिलं पाहिजे. जा रे तलवारमाशा, जा, तुझ्या नाकावर देवानं तलवार दिली आहे ती कशाला ? तू एखादे छानसे कासव तुझ्या तलवारीने भोसकून मला दे आणून ! नीघ इथून ! बेढब कुठला !"

"राम राम ! काय हे भयानक तोंड या कुरूप माशाचं ? वाटतं पळून जावं हे ध्यान बघण्यापेक्षा. नीघ येथून भयानकमाशा ! तुला हेच नाव दिलंय मी."

"तुम्ही सारे क्षुद्र आहात अगदी– भिकारडे कुठले. वीतभर सुद्धा लांब नाही आहात ! मी मात्र हातभर लांब आहे अन् कांती बघा माझी चकचकीत ! माझे हे राज्य म्हणता, पण असले दरिद्री अन् रद्दी लोक, त्यांचं राज्य मला नकोच आहे. माझा

व्हावा तसा आदर या वीतभर तळ्यांत काय होणार ?"

एक छोटी सुवर्णासारखी चमकणारी मासोळी खट्याळपणे म्हणाली–

"अगदी खरं आहे, राजे ! मी मावशीकडे गेले होते ना, त्या मोठ्ठ्या पवित्र गंगामातेत रहायला, तेव्हा पाहिले. गंगामाता या तळ्यापेक्षा फार फार मोठी– समुद्रराजांची बहीणच जशी काही ! तर तिथे तुमच्या राज्यात शोभतील असे छान छान सुंदर व मोठे मासे पाहिले बरं का ! कित्ती रंगतदार होते, वाटलं, बघतच राहावं– तिथंच रहावं–"

"मग परत का आलीस त्या जलनगरीतून ?"

सोनमासळी खोटं दुःख दाखवीत खिन्नपणे म्हणाली–

"काय सांगू, राजे ! तेथे केवढाले उग्र भयंकरही मासे होते ना ? कोणी काळेकुट्ट पण ढगासारखे ! कुणाला आठ पाय न् डोकेच नुस्ते ! कुणाचं तोंड घोड्यासारखं. ते सगळे राक्षसमासे म्हणायला लागले आपले मावशीला– 'काय तुमची भाची नखरेल अन् सुरेख आहे हो ? वा, वा ! सोनपरीच जशी. माझं लग्न हिच्याशीच लावून द्या ! !' त्यांच्यांत लागली भांडणं ! ! मग मावशी म्हणाली मला–' सोने, परत जा बाई तू ताईकडे, तुझ्या त्या वीतभर तळ्यात. हे राक्षस मलाच खायलात उठलेत जसे !' खरं म्हणजे तेथे इतके झकास मासे होते दुसरे चांगले चांगले, माझे मित्र झाले होते ते. मला तिथेच फार आवडत होतं– पण मग एके दिवशी मावशी मला स्वतः इथे घेऊन आली. ही मोठी माणसं आमचं ऐकताहेत कुठं ! !"

ऐकणारे वृद्ध मासे मनात हसत होते त्या सोनकुलीचं ते लाडकं लाडकं बोलणं ऐकून. राजा मात्र फसला होता या बोलण्याने. तो

म्हणाला—

"मग माझ्याएवढा चकचकीत सुरेख मासा तिथे कोणी नाही ?"

"मी तर कुण्णी पाहिला नाही तसा वाई !" सोनमासळी म्हणाली.

"अरे ! म्हणजे चांगले रुबाबदार भव्य मासे तेथे नाहीतच की काय ?"

"अं, तसे कुणीकुणी होते— पण छे ! आपली सर नाही, राजे ! ते तुमचे नोकर शोभतील असे मला वाटले बघा एकदम !"

"पण कोणी कोणी गुणांचे मासेही असतीलच की, कसे होते ते सांग."

"हां. तसे अद्‌भुत मासे खूप बघितले मी— सांगते, ऐका हं.

एकदा एका लाल मोठ्या फुलाच्या मी सहज जवळ गेले तर त्या छान छान फुलाच्या पाकळ्या मला गुंडाळून ओढू लागल्या आपल्यापाकळ्यांना कसले काटे आणखी ? तेवढ्यात मावशीनं मला ओढून घेतलं जोरात ! ती ओरडली—

'कारटे, या विषफूल माशाजवळ कशाला गेलीस ? मरत होतीस की !' तर हा जलपुष्प मासा. भारी सुरेख रंगाचा— पण महाभयंकर शत्रू. छोट्या माशांचा. राजे, तेथे एक विचित्र मासा आहे. तो विंचवासारखा नांगी मारतो बरं का. एक मासा तर वाटोळ्या चेंडूप्रमाणे वाटे— पण सर्वांगी काटे !! नको थांबणे तेथे ! कुणाच्या अंगातून उजेड चमकतो— जसा काजवाच— पण फार मोठा— अन् काळूराम ? शी शी ! काय ग वाई कुरूप तो ? एकादं भूतच जसं काही पाहिलंसं वाटतं मला !"

"म्हणजे सोने, माझ्यासारखा नीलवर्ण देखणा अन् मोठा मासा

कुणी नाहीच का तिथे ?"

"बहुतेक नाहीच ! निदान मी तरी नाही बघितला ! कुठे ते बेढब कुरूप मासे अन् कुठे आपलं राजबिंडं रूप ! !"

"काय ग, तू कुणाशी लग्न करणार आहेस ? माझ्याशी ?"

"छे छे ! माझं लग्न झालं राजे– माझ्या चुलतभावाशी. आता मी सासरी जाणार गंगामाता जलनगरीत ! लौकरच–"

"बरं, कशी जातेस ? कळू दे की."

"त्यात काय ? गंगामातेला पूर येतो ! साधा नाही काही– महापूर ! मग जवळपासची सगळी तळी भरू लागतात त्या पाऊस पाण्याने. गंगाजलाचा ओघ भरती आल्याप्रमाणे इथे येतो. त्यात शिरून मी जाईन तरंगत ! !"

मग मासोळी नृत्य करीत तेथून दूर गेली. नीलराजा विचार करू लागला–

"खरंच ! माझ्यासारख्याला मोठं जलराज्य हवं, ते राज्य करायला मीही जाईन– गंगामाता जलनगरीत !"

आणि खरेच, जेव्हा पावसाने ते तळे भरले व गंगेच्या पाण्याचा ओघ सखलातून वाहाणाऱ्या नदीला व तळ्यांना मिळाला, तेव्हा राजा मासा तिकडे पोहत निघून गेला !

"तुमच्यासारख्या क्षुद्र अन् अज्ञानी लोकांत माझ्यासारख्यानं राहू नये हेच योग्य. मी मोठं राज्य करायला जातोय. नमस्ते !" तो जाताना म्हणाला.

काही मोठे, त्याच्या जुलमाला कंटाळलेले, मासे म्हणाले– "छान युक्ती केलीस, सोनमासळी ! बरी पीडा गेली एकदाची.

सदा ते मी मी करून गर्वाचं बोलणं, नकोसं झालं होतं बघ त्याचं."

तर छोटे मासे म्हणाले– "अग, तो आमचाच फराळ करायचा रोज, अन् वर आम्हालाच क्षुद्र म्हणायचा ! हा जुलूम सोनूताई, तू दूर केलास, फार बरं अन् मोकळं, निर्भय वाटलं बघ !"

सोनू मासोळी मजेत खिदळत होती,

इकडे हातभर राजा गंगाजलाच्या महानगरात पोचला खरा, पण पाहतो तो काय ? त्याहून कितीतरी देखणे मोठमोठे मासे तेथे हिंडत होते ! एक मासा तर अतिसुंदर छत्र असावे तसा. हे 'छत्र' राजाला फार आवडले ! आपण हे छत्र मस्तकावर धरल्यावर खरेच शोभू असंही तो मनाशी म्हणाला.

मग तो ते 'छत्र' स्पर्श करून पाहणार, तोवर एक मासा म्हणाला– "कोण रे तू, निळ्या ? कुणी नवा दिसतोस ! कशाला स्पर्श करतोस तू माहीत आहे ? ही छत्री नाहीए ? अन् या छत्रीची ही झालरही नाही– तर विषाच्या वेली आहेत जशा या. तुला स्पर्शाने हा छत्रवाला राजा मासा विषप्रयोग करील ! पळ पळ इथून !" अन् मग निळा राजा दूर सरकला. तेवढ्यात दोन छोटे मासे या छत्राजवळ आले व स्पर्श होताच गतप्राण झालेच ! मग निळा राजा धावत दूर गेला. अरे बाप रे ! समोरून हे नुसते चेंडूप्रमाणे पण खूप मोठे डोके कोणाचे– अन् हे मी काय बघतो ? हे तर नुस्तेच डोके ! याला अंगच नाही ! पण किती प्रचंड मोठा हा ! डोळे कसले चमचमताहेत याचे !

त्याजवळ तो गेला व जरासा धक्का त्या डोक्याला लागलाच. त्या डोक्यातले ते डोळे गर्रकन् फिरले व राजाकडे पाहू लागले व 'डोक्यातून' आवाज आला–

"मूर्खा दूर, दूर हो, चेंगरशील ना माझ्याखाली ! या सूर्य-माशाला कधी पाहिलं नव्हतंस का रे, क्षुद्रा ?"

"मी क्षुद्र नाही महाराज– राजा आहे राजा !"

"कुठल्या डबक्याचा राजा ? कळू दे ? वीतभर तळ्याचा हातभर राजा म्हणे ! मुंगीसुद्धा आपल्या नखभर वारुळात राणी म्हणते स्वतःला, तसा तू ! म्हणे राजा. तुझं वजन कितीसं ? फार तर पाचशेर ! अन् माझं वजन ? माहीत आहे का मासु-रड्या ? पाचशे शेर आहे. क्षुद्र राजे, चालते व्हा, नाहीतर या देखण्या शरीराचा मी गुलगुलीत घासच करीन एक ! काय चवदार लागेल ?" तो प्रचंड गोळा अंगावर येऊ लागला तशी भयाने राजा दूर दूर गेला. आपण फार मोठे कुणी आहोत, या गर्वाचा चूरचूर होत होता त्याच्या. जगात शेराला सव्वाशेर– नव्हे नव्हे 'पाचाला पाचशे शेर' आढळतातच हे त्याला आज पटले.

अन् मग त्याला अनेक असे थोर मासे भेटले व त्याच्या शरी-राला व मनालादेखील– जोरदार धक्के देत ते पुढे गेले. एक 'वाघमासा' नावाचा मत्स्य तर जबडा उघडूनच पोहत होता. केवढा भयंकर जबडा, जसे मृत्यूचे दारच होते ते. त्याने तर निळ्या राजाची शेपूटसुद्धा कुरतडली थोडी. झटपट राजा चपळ-तेने पळाला म्हणून वाचला. पण त्याने वाघ्यामाशाची गर्जना ऐकली, "ये लहान निळू माशा, दिसतोस गोंडस बरा ! पण

खायला चवदार लागशील तर खरा! एवढंसं हे निळं गोजिरवाणं कार्टं पळालं तरी कुठे ?"

भीतीने थरारत राजा मनाशीच म्हणाला–

"बाप रे! कशाला मी या भयंकर जलनगरीत आलो? येथले राज्य करायला एखादा देवमासा, दानवमासाच योग्य! माझ्या देखणेपणाचा विचारसुद्धा इथले हे जलराक्षस 'सुंदर गुळगुळीत घास' असाच करतात! आणि अशांचीही वस्ती खूप दिसते या गंगेच्या महानगरात. मला परत माझ्या शांत निर्भय तळ्यात जायचंय– ते लोक चांगले आहेत!"


काही दिवस तो एका गरीब वृद्ध माशाजवळ राहिला. त्या जलनगरात फक्त भक्ष्य मिळवण्यापुरतंच तो फिरून येई– उगीच थोडेसे! आणि मग पावसाळ्याची वाट बघत राहिला राजमासा!

आणि पाऊस आला जोरदार! टप्‌टप् थाड्‌थाड् थेंब आले, विजा चमकल्या, ढग गडाडून गरजले. ओरडले खूप. अन् हत्तीच्या सोंडेसारख्या पाऊसधारा खळाळत गंगेवर अभिषेक करू लागल्या. परत गंगा जोराने चहू बाजूंनी भरून वाहू लागली. त्या जलौघावर स्वार होऊन मासा, नव्हे राजमासा परत आपल्या छोट्या तळ्यात परतला–पण हे काय? आता तो गर्वानं बोलत नव्हता, सगळ्यांशी उलट गोड गोड बोलत होता! "तुम्ही माझे मित्र आहात!" असं म्हणत होता, "याचा माजुरीपणा कसा गेला?" एकाने सोनीला विचारले. ती म्हणाली– "जगात शेराला सव्वाशेर असतोच, दादा! अन् तो भेटल्यावाचून याचा गर्व उतरणार

नाही हे मला माहीतच होतं. मी गंगानगरात जेव्हा ते प्रचंड मासे अन् त्यांचे ते राक्षसी आकार पाहिले तेव्हाच म्हटलं मनात– आमच्या ‘ खासेराव मासेरावांची ’ एकदा ह्या दैत्यांशी गाठभेट झाली की, ते सुतासारखे सरळ येतील ! अन् तसंच झालंय की नाही ?”

आणि आता सर्व तळें आनंदाने लहरत होते ! प्रजा व राजासुद्धा !

*



## ३. छोटू हत्तीची सोंड

फार प्राचीन काळी हत्तीला लांब सोंड नव्हती. डुकराच्या नाकाप्रमाणे त्याचे नाक फक्त मोठेसे बोजड व रुंदट होते, त्याखाली त्याचे तोंड झाकून जाई अगदी. मग ही अशी लांब सोंड केव्हाशी उत्पन्न झाली ? कशी ? तीही एक मजेदार हकीगत आहे, मोठी ऐकण्याजोगीन !

त्या प्रचंड अरण्यातला राजा हत्तीच होता. त्याची ताकद भयंकर, देह केवढा प्रचंड, तो तुम्ही आजही बघताच. याचा मुलगा छोटा हत्ती ! हत्ती म्हणण्यापेक्षा 'छोटू हट्टी म्हटलं तरी चालेल. पण तो पडला राजपुत्र, तेव्हा सगळे त्याचे हट्ट पुरे करायचे तेथले प्राणी. लहानपणी मुलं खूप जिज्ञासू असतात, तुम्ही नाही आहात का ? बस्, छोटू हत्ती तसाच होता. सगळीकडे आपल्या बारीक डोळ्यांनी तो लुकूलुकू बघायचा. मग ज्याला त्याला प्रश्नच प्रश्न. आईला विचारायचा तो–

"आई, वाघकाकांच्या अंगावर पट्टे कुणी कसे रंगविले ग ? अन् चित्ताकाकांच्या अंगावर छान वाटोळे ठिपके कुणी दिले ? सांग ना. आम्हाला का असला एकच रंग ? का म्हणून ?" आई काय सांगणार बापडी ? फार तर म्हणे,

"अरे, त्यांना देवानंच तसा रंग, पट्टे, ठिपके दिले !"

"मग मला कुणी हा काळपट मातीचा रंग चोपडला ? देवानं की तूच ? अन् आपले दात तोंडाबाहेर काय म्हणून ?"

काय उत्तरं द्यायची याला ? हट्टीची आई म्हणे,

"मला नाही माहीत ! दुसऱ्या कुणाला विचार जा."

वा ! हे तर छानच. तो सगळ्यांना मग प्रश्न करू लागला,

"उंटमामा, तुमची पाठ अशी उंच का झाली हो मधोमध ?"

"जिराफदादा, तुमची मान किती लांब ? झकास दिसते ! कोणी केली हो ?"

"साळूमावशी, तुझ्या अंगावर काटे किती ग ? बोचत नाहीत का तुला ?"

त्या सगळ्यांना याची उत्तरं देता यायची नाहीत. कसे न् कोण समजावून सांगणार असल्या गोष्टी ? पहिल्यांदा असल्या प्रश्नांचं

त्यांना मोठं कौतुक वाटे. पण जिथे तिथे अन् जेव्हा तेव्हा हा छोटू हट्टी त्यांना गाठून हेच किंवा असलेच प्रश्न विचारू लागला, मग मात्र ते चिडून म्हणू लागले,

"गप्प बैस. तुला काय करायचंय ?" किंवा

"सारखे प्रश्न प्रश्न बस झाले. आम्हाला नको विचारीत जाऊस."

पण यापलीकडे त्यांना बोलता येत नसे. बोलून चालून राजपुत्र, प्रजेनं त्याला कसं रागवायचं, कसे वेडेवाकडे बोलायचे ?

पण छोटूचे कान चांगले मोठ्ठे होते. मोठ्या प्राणी मंडळींच्या गोष्टी तो नीट ऐकत असे, त्यासंबंधी विचार करीत बसे व मग कुणाला तरी काही प्रश्न करी. अलीकडे एक नाव त्याच्या कानावर दोन चारदा आले होते. सुसर ! रानातून एक फार मोठी नदी वाहात असे, तेथे पाणी प्यायला सगळ्यांनाच जावं लागे. छोटू कधी एकटा नदीवर जायचा नाही. म्हणजे, आई त्याला जाऊ द्यायचीच नाही. सदा ती बरोबर असे व पाण्यात डुंबू तर मुळीच देत नसे ! फार राग येई त्याला. किती खोल पाणी, कसे गारगार, अन् उकाडा कोण ? तरी पोहायचं नाही ? स्नान नाही करायचं ? आपलं काठावर बसून पाय धुऊन परत ! हे काय ? असं का ? आईला विचारावं तर ती म्हणे—

"तेथे सुसर राहाते. तिचं जेवण फार वाईट असतं, बेटा. चल, दूर जाऊ या."

आं ? सुसरीचं जेवण ? हे काय तो नवंच ऐकत होता ? त्यानं विचारलं,

"पण, वाईट जेवण ? म्हणजे कसं ?"

मग आईचं अंग थरारलं. ती म्हणाली.. "छोट्या, हट्टी पोरा,

परत नाव घेऊ नकोस त्या बयेचं. चल परत." मग ती चटकन वळून परत येई, त्याला घेऊन. एकदा त्याचे बाबा कुणाला सांगत होते,

" अहो, तो मनुष्य खुळ्यासारखा नदीतून चालला. अन् काय ? सुसरीने चट्टामट्टा केला त्याचा. छान फराळ झाला तिचा."

" चट्टामट्टा ? ही काय भानगड ?" छोटूने विचारले.

" चट्टामट्टा म्हणजे, जेवण पुरतं जेवून पार करणं, समजलं ? जा, इथून तू." बाबा रागावले. पण ' सुसर, तिचा फराळ, तिचं जेवण, चट्टामट्टा ' हे शब्द त्याच्या डोक्यात फिरत राहिले. कसे असते हे जेवण ? त्याने दोन-चार जणांना विचारले. पण गाय, कोल्हा, लांडगाभाऊ, ससुलकाका कुणीच धड उत्तर देईना ! ' सुसर ' नाव काढले की, ते एकदम गप्प होत व म्हणत " कोण जाणे बुवा, पण आम्हाला कामं आहेत, वेळ नाही सांगत बसायला !" अन् खुशाल ते पाठ फिरवून चालते होत. बापड्या छोटू हट्टीला त्या सुसरीचं जेवण कसं असतं हे कळेचना ! आहे काय भानगड ? कुणी का उत्तर देत नाहीए ? जा, नका सांगू ! मीच काढतो हुडकून– तो म्हणे मनातच.

एक दिवस छोटू हट्टी कंटाळून खरोखरच एकटा नदीकडे चालू लागला. काठावर थांबून जेवण पाहायचं न् परत यायचं. आहे काय त्यात मोठं ? वाटेत अजगर आजोबा वाट अडवून पडलेले. छोटू ओरडला– " आजोबा, अहो, दूर व्हा ना. माझा पाय पडत होता की ! मी लहान असलो, तरी वजनदार आहे, तुम्हाला त्रास झाला असता पाठ चेंगरून." अजगर आजोबा हसले अन् सावकाश बाजूला होत म्हणाले–

" छान आहेस पोरा तू. कुठे चालला आहेस, राजपुत्रा ?"

"सुसर राक्षसिणीचं जेवण कसं असतं, ते पहायला !"

अजगरसुद्धा एवढा मोठा असून दचकला व हातभर मागे सरकला. पण हे ऐकून तो म्हणाला, "काय ? गजराजांनी तुला परवानगी दिली एकटयाला नदीवर जायला ?"

"परवानगी ? म्हणजे काय म्हणता ? नाही, बाबांनी मला नाही काहीच दिलं. ते कुणी सांगत नाहीत, म्हणून तर मी हा शोध लावायला निघालोय. तुम्हाला ठाऊक आहे सुसरीचं जेवण ?"

"ऐकून माहीत आहे– पण नक्की ठाऊक नाही–"

"कसं असतं ते ?"

"एकदम अंधारात अन् पाण्यातच जेवते ती ! हे भलं मोठं गुहेसारखं तोंड ! शंभर दाढा– त्यांच्या रांगा ! बस् इतकंच पाहिलंय मी बेटा. पण तू एकटा जाऊ नकोस. ती वया भयंकर दुष्ट आहे. मी येतो."

"चला आजोबा. तुम्हालाही जेवण बघता येईल तिचे ! म्हणूनच येता ?"

"न. .नाही रे. मला पाणी प्यायचंय थोडंसं. तहान लागली, म्हणून येतोय, चल पोरा." मग अजगर सुस्त चालीने पुढे पुढे चालला व पाठोपाठ हट्टी. रानात काय गमती जमती होत्या– पण तिकडे छोटू हट्टीचे लक्षही नव्हते. सुसर नदीत राहते, नदी केव्हा दिसेल ? तिचं जेवण केव्हा पाहू ? असं असं झालं होतं त्याला.

आली– आली, नदी जवळ जवळ दिसू लागली. काठावर कित्ती नारळीची झाडे ? अहाहा ! पण या दुष्ट झाडांनी सगळी फळं अगदी जशी उंच डोक्यावर धरलीत ! खायची कशी आमच्या-सारख्यांनी ? रागाने धप् धप् पावले टाकीत हट्टी नदीकाठी

आला. तहानही फार लागली त्याला– पाण्याची अन् सुसर राक्षसिणींचं जेवण बघण्याचीही ! अजगराला तो म्हणाला–

" आजोबा, नदी आली. पाणी पिऊन येऊ या आता–"

एकदम अजगर लांब पसरला. नदीकाठाशी तोंड लावून पाणी पीत म्हणाला–

" होय, मी पितोय पाणी, तूही अगदी काठाशी उभा राहा जमिनीवरच. फक्त तोंड पुढे करून पाणी पी अन् चल परत झटकन."

अजगर केवढा मोठा, त्याचं पाणी पिणं म्हणजे बादलीभर पाणी सहज हवं. तो पाणी पितो तोवर हट्टी म्हणाला–

" आजोबा, तोंड फक्त पुढे कसं करायचं मी पाण्याजवळ ? हे आमचं भलं मोठं, द्वाड बोजड नाकच पुढं जातं ना ! पण येतोच मीही पाणी फक्त पिऊन– फक्त एक पाऊल पाण्यात ठेवतो की बस्."

" हां हां, पुढे जाऊ नकोस– बेटा, पुढे नाही जायचं–"

" नाही नाही, अगदी नाकासमोर !" कुचेष्टेनं हट्टी उद्गारला. नदीकाठाशी उभा राहिला. नदीत दोन रत्ने चमकत होती. कसली ? काय तेज दिसत होतं ? पुढे जावं अन् पहावं का ? कसली रत्नं ? पण नकोच...पाण्यात जायचं नाही–ताकीद आहे. देवा, ती रत्नं मला जवळून पाहू दे ना ? काय नवल ? ती रत्ने जवळ जवळ आली. एक हातभर लांब तोंडही हलकेच दिसू लागले. रत्ने नव्हेत, ते तर डोळे होते.

हट्टी धिटुकलेपणे म्हणाला– "कोण हो तुम्ही, मावशी ?"

" मी सुसरसुंदरी– आजीच म्हण बाळ मला. येतोस याझ्या घरी ? फार फार छान फुलं-फळं आहेत ! अरे उजेड देणारी

फुलं आहेत, पहायची आहेत ?"

उजेडाची फुलं ? हट्टी देहभान विसरला. सुसर आजीचे बोलणे तर मोठ्ठेच गोड. जावं का ? जाऊ ? पण नाही, पुढं नाही जायचं ! त्यानं मागं वळून पाहिलं, आजोबा सुस्तावलेले होते. तो तेथूनच म्हणाला–

" नको. मला फुलं बिलं नाहीत पहायची, पण तुमचं जेवण काय असतं ? ते मात्र बघायचं होतं. पण सगळी नको म्हणतात यायला."

" म्हणणारच ! त्यांना कुणाला कधी तसं जेवण मिळत नाही ना ? म्हणून राग."

" दाखवा ना तेवढं मला."

" अरे, दुरून कसं दिसेल ? तू पुढे ये जवळ. ताट इथेच वाढलंय मी, बघ–"

" नाही बुवा ! पुढे नाही– इथेच पाणी पितो मी–"

" पण त्या जागी तर घाणेरडे बेडूक आहेत, तेही पिणार बेटा ? राजा, जेवण राहू दे माझं, पण तू एक पाऊल पुढे येऊन स्वच्छ पाणी पी, एवढंच या वेड्या आजीचं सांगणं. ऐकावं लहानांनी. घाण बेडकांनी गढूळलेलं पाणी पिऊ नये–"

" वा ! यात काय वाईट ? एक पाऊलच तर पुढे. तो पुढे सरकला फक्त दोन पावले. तेवढ्यात आजी जवळ आलीच सर-सरत व खदखदत म्हणाली–

" हे बघ माझं ताट. मांडलं इथेच, कारट्या, बघ ! मी आज तुलाच खावं म्हणतेय. कसा कोवळा आहेस, ताट आहे हे माझं– भलं मोठं तोंड; त्यातच पहायला चल, ये, ये रे छबुकड्या–"

अन् त्या राक्षसणीने त्याचं ते बोजड नाकच पकडलं दाढेत व

लागली ओढायला पाण्यात. बापरे ! ही माझंच जेवण, माझाच ‘ चट्टामट्टा ’ करणार होय ? अन् म्हणूनच सगळे हिचं नाव काढलं की दचकत होते. घाबरत होते ! तो ओरडला–

“ आजोबा, धावा, सुसर आजीनं माझं नाक पकडलंय, ती मला ओढतेय, नाक फार दुखतंय– या लवकर, धावा. मला घ्या ओढून, घट्ट धरलंय हो हिनं–”

बापरे, हे काय झाले ? आजोबांची सुस्ती पळाली, त्यांना जलद हालचाली करवत नसत पण त्यांनी चटकन् त्याच्या पुढच्या पायांना विळखे घातले व ते मागल्या बाजूस तोंड करून सरपटू लागले– अगदी हळूहळू. बापड्या हट्टीची अवस्था कठीणच झाली, ही प्रचंड आजी नाक गच्च पकडून पुढे खेचते अन् हे दांडगेश्वर आजोबा मागे ओढतात ! हाय हाय, नाक किती दुखतेय् ते वेगळंच. या भयंकर ओढाताणीत मी मधोमध तुटून तर जाणार नाही ? पण नाही. देह प्रचंड होता. त्याची तूटफूट नाही झाली, पण बोजड नाक मात्र या ओढाताणीने लांबत चालले, अखेर त्याला टोक आले ! तेवढ्यात आजोबांची या ‘ हत्तीखेचीत ’ सरशी होऊन नाक त्या राक्षसिणीच्या तोंडून निमुळते होऊन निसटले व धाडकन् हट्टी किनाऱ्यावर कोसळला– सुसर सपासप परत गेली रागाने. तोंडचा घास गेला अन् तोही एवढा मोठ्ठा, कोवळा, लुसलुशीत मांसाचा. राग येणारच तिला.

एकदाचं ते हट्टी पोरटं सुटलं, हे पाहून अजगर आजोबांचे वळसेही सैल होऊन हलकेच सुटले व आडवा, कोसळलेला छोटू हट्टी धडपडत उठून उभा राहिला. बोलण्याचेही त्याला त्राण नव्हते. त्याच्या डोक्यावर माशा येऊन बसल्या, त्या हाकलण्या-चेही त्याला उमजेना. (एरवी तो झाडाच्या शेंडाला डोके घासा-

यचा अशा वेळी) माशांचा त्रास वाढला तशी त्याची ती नाकाची लांबलचक सापासारखी आकृती त्याला नकळत वळवळली व फटदिशी त्याला डोक्यावर तिनं सपाटा दिला. माशा राहताहेत कशाला ? छान, पोरं कशाचंच दु:ख फार वेळ करीत नसतात. त्याला हसूच आलं. तो म्हणाला–

"ओ हो, आजोबा, या लांबट झालेल्या नाकाचा उपयोगही बराच जास्त होणार बरं का. आता मी जरा कुरूप दिसणार– पण हे नाक छान आहे बुवा–"

आजोबा म्हणाले– "बाबा रे, जिवंत सुटलास मरणातून हेच नशीब गजराजांचं. अन् आता नव्यानं काय कुरूप दिसणार आहेस बेटा ? हे मोठे कान, जाड खांब पाय, हे मोठाले दात, याला हेच नाक जास्त बरं दिसतेय. उलट, छान दिसतोस आता बेटा, जास्त रुबाबदार."

"खरंच का ? आजोबा– माझा जीव वाचवला तुम्ही, काय देऊ ? बोला, मागा."

तो राजाच्या ऐटदार पद्धतीने म्हणाला. अजगर म्हणाला–

"काय देणार आहेस, छोटया ? अरे साधा एक नारळ हवा होता. तो पण तुला देता यायचा नाही ना, उंचावरचा ?"

उंचावरचा नारळ ? हट्टीच्या डोक्यात एक कल्पना लकाकली. लपकत लपकत, तो नारळाच्या एका जरा कमी उंच झाडाखाली जाऊन उभा राहिला. मग पटकन् नवे लांबलेले नाक त्याने वर केले व खाडकन् नारळ तोडला, फाडकन् आपटून फोडला व ताडकन् आजोबांना दिला. आजोबा खूष खूष झाले.

आणि हट्टीही खूष. तो म्हणाला,

"आजोबा, हे माझे नवे तोंड–"

"बच्चू, तोंड नको म्हणूस. सोंड म्हण. ते बरं. यात दात नाहीत

तोंड म्हणायला."

"बरं बुवा, ठीक, ही माझी सोंड मोठी उपयोगी पण आहे, पाहिलंत ना ? अन् आमच्या सबंध गजराज घराण्यात कुण्णाला सोंड नाही, फक्त मलाच ! आई-बाबांनासुद्धा मी चिडवणार आता. बघा म्हणावं, माझा नवा दागिना. किती जम्मत होईल, नाही का ?"

"हां, ते ठीक. पण परत जाऊ नकोस सुसरीचं जेवण बघायला पोरा, कधी."

"छे छे, नाही बाबा. मी ते पाहिलंय, म्हणजे शंभर दाढांचं ताट ! परत कधी नाही मी एकटा जाणार तिकडे."

"अच्छा बेटा, जातो"– अजगर वळला तशी चटकन् नवी सोंड वर उचलून धरून त्याने त्याला नमस्ते केलं. हा आणखी एक उपयोग. आणि ऐटीने आपली सोंड हलवीत छोटू हट्टी गजारण्याकडे निघाला– सगळ्यांना सोंडेची ऐट दाखवायला व चिडवायलासुद्धा ! (आधारित)

✱



# ४. मित्र असावेत तर असे !

त्या तिघांची मैत्री ही, त्या सर्व रानातल्या प्राण्यांना मोठी अजबच वाटायची. बरोबर आहे, मैत्री नेहमी सारख्या वयाच्या, सारख्या स्वभावाच्या लोकांतच होते म्हणतातच मुळी; पण या तिघांतला एकजण आकाशात उडणारा, तर दुसरा पाण्यात पोह-णारा, अन् तिसरा ? रानांवनांत सुसाट धावणारा ! कावळा

पक्षी, तर कासव जलचर आणि सांबर सदा पाठीस वाघ लागल्या-प्रमाणे धावत सुटणारे. पण तरी हे तिघे जिवलग मित्र होते ही गोष्ट खरीच, कारण ते शेजारी शेजारी राहत होते.

रानात एक छानदार गोड पाण्याचे तळे होते. त्या तळ्या-काठच्या एका दाट झाडावर कावळ्याचे घर. तर सांबर त्याच झाडाच्या छायेत विश्रांतीला येई व मग कासवही तळेकाठ सोडून हळूहळू झाडाजवळ येई. मग या तिघा शेजाऱ्यांच्या गप्पागोष्टी होत. अखेर ही मैत्री वाढत गेली व एकमेकांच्या अडीअडचणीच्या वेळी धाव घेऊन मदतीला येण्याच्या त्यांनी शपथा घेतल्या एक दिवस.

कावळा म्हणाला– "आभाळाची शपथ, मी मैत्री जपेन व तुम्हा दोघांना संकटप्रसंगी वाचवायसाठी आकाशपाताळ एक करीन."

सांबर म्हणाले– "धरतीमातेची शपथ, या मैत्रीसाठी मी जिवाचं रान करीन. धावपळ करीन."

कासव म्हणाले– "जलदेवाची शपथ, तुम्हाला पाण्यात पाह-णाऱ्या लोकांना मीही त्रास देईन."

अन् ह्या शपथेप्रमाणे ते सदा वागायचे.

संध्याकाळची वेळ. तळ्याकडे एक पारधी निघाला होता. थोडा पाऊस पडून गेल्यामुळे रानची जमीन भिजट झाली होती. त्यात त्याने खुरांच्या खुणा चांगल्या स्पष्ट उमटलेल्या पाहिल्या. पारध्याला पाऊलखुणांवरून कोणता प्राणी त्या रस्त्याने कुठे गेला हे कळणा-रच. तो मनाशी म्हणाला,

" वा ! आज चांगली शिकार सापडणार सांबराची. तर याच वाटेवर मी जाळे लावून ठेवतो न् घरी जातो मी. ये म्हणावं धावत– अन् सापड माझ्या जाळ्यांत ! नक्की तळ्याकडे याच रस्त्याने येणार सांबरे !"

मग जाळे वाटेत लावून ठेवून पारधी दूर निघून गेला.

आणि काय ? बापडे सांबर नेमके जाळ्यात सापडलेच. व सुटकेसाठी धडपडत राहिले.

इकडे त्या संध्याकाळी कावळा व कासव कित्ती वेळ तरी आपल्या सांबरमित्राची वाट बघत बसले होते. उशीर झाला, सांबराचा पत्ताच नाही ..शेवटी कावळा म्हणाला–

" कासवभाऊ, काहीतरी दगाफटका झाला आहे सांबरदादाला. त्यावाचून तो इतका वेळ बाहेर राहणार नाही. त्याची रानची वाट मला आहे ठाऊक. मी आत्ता बघून येतो–"

" मी पण येतो– मलाही ठाऊक आहे की रस्ता, कावळाप्पा."

" चल, पण मी आधी पोचेन–"

" ठीक. मग वाटेत मला येऊन सांग. उगीच तळापर्यंत तुला खेप नको परत–"

निघाले दोघे– कावळा आधी पोचला. पाहतो तो चिवट दोरीच्या जाळ्यात सापडलेले सांबर जाळ्यातून बाहेर यायला धडपडते आहे ! पण असल्या शिकाऱ्यांच्या जाळ्याची गंमत ही असते, की त्यात सापडलेला प्राणी जो जो सुटायची धडपड करतो तो तो अधिकाधिक जाळ्यांत गुरफटत जातो ! सांबराचे तसेच

होऊ लागले होते.

कावळा फार धूर्त, त्याला हे माहीतच. तो म्हणाला–

" सांबरदादा, आता आणखी धडपडू नकोस ! आम्ही आलो आहोत मदतीला. आम्ही तुला सोडवायची युक्ती काढतो. मुळीच घाबरायचं नाही ! पडून राहा नुस्ता."

मग कावळा वेगाने परत गेला व कासवाला अर्ध्या वाटेत गाठून त्याने हे सांगितले व विचारले–

" कासवभाऊ, त्या जाळ्याच्या दोऱ्या फार चिवट असतात, कशा तुटतील ?"

कासव म्हणाले–

" ते माझं काम. मी तोडीन. माझे दात फार तीक्ष्ण आहेत मित्रा. तिथे पोचतोच आहोत आपण– आत्ता तोडून टाकतो जाळं मी ! आपल्या मित्राची सुटका करायला हवी. लौकर चल."

" लौकर ? तूच चालायला लाग लवकर लौकर ! मी तर केव्हाच उडून जातो तेथवर ! तुझ्यापुढे. बघ !" कावळा म्हणाला.

ते दोघे तेथे पोहोचले. कासवाने खरेच संथपणे एकेक दोरी कुरतडून सांबराची शिंगे मोकळी केली, नंतर इतरही दोऱ्या थोड्या तोडल्या व टप्पकन् सांबर उडी मारून बाहेर आले. ते म्हणाले–

" कासवभाऊ, काऊअप्पा, तुम्ही आज मला मरणातून सोडवले. किती उपकार केलेत ? पण मला भयंकर तहान लागली आहे. मी जाऊ का तळ्यावर ? नाहीतर तो पारधी आता येईल अन् मला बाण मारील !"

कासव म्हणाले–

" जा बाबा, पळ. मी येतो लपतछपत सावकाश." कावळा

म्हणाला– ये जपून. मीही त्याच्याबरोबर जातो. अरे, मी जेवण केलं नाही या गोंधळात. भूक लागलीय मला. जाऊ ?"

"जा, मी येतोच पाठोपाठ !"

ते दोघे तळ्यावर जाऊन वाट बघत बसले कासवाची– पण कासवाचा पत्ताच नाही. "परत या मित्राला काय झाले आता आणखी ? हत्तीनं पायबिय दिला की काय ? सांबरदादा, बघून येतो बुवा मी– मला नाही चैन पडत ! आमचे हळुराव कुठेतरी वाटेत सापडायचे अडचणीत !" कावळ्याने चिंता करीत म्हटले.

कावळा भुर्रकन् उडून पाहून आला, तर काय ? त्याला भीती वाटत होती तसंच झालं होतं. पारधी परत आला होता व जाळे तुटलेले बघून आजूबाजूला बघतोय तर थोड्या अंतरावर कासव लुटुलुटु चालते आहे आपले. पारध्याने त्याला उचलून घेतले. त्याच वेळी कावळा आला व एका फांदीवर बसला– जवळच्या झाडावर. त्याला पारध्याचे शब्द ऐकू आले–

"ते द्वाड सांबर साले कसे पळाले, देव जाणे. ते पळाले तर पळाले, हे लठ्ठ कासव तर मिळाले ? याचेही मांस छान लागते."

त्याने आपल्या जवळच्या थैलीत कासवाला बंद केले. कावळा वेगाने उडत गेला. थोड्या अंतरावरच सांबर उभे होते. कावळा म्हणाला–

"सांबरदादा, मला भीती वाटत होती तसेच झाले." त्याने कासवाची हकीगत सांगितली.

दुःखाने सांबर म्हणाले–

"काय ? माझा परम मित्र त्या दुष्ट पारध्याने पिशवीत टाकला ? अरेरे, कसा वाचवू त्याला मी ?"

कावळा म्हणाला– मी आहे ना ? तू नको काळजी करू. मी

सांगतो युक्ती तसे कर ! म्हणजे कासवभाऊची मी सुटका करतो की नाही बघ !

मग सांबराने ती युक्ती ऐकली व आपली मोठ्ठी शिंगे असलेले डोके हलवीत संमती दिली

आणि मग त्या युक्तीप्रमाणे सांबर लंगडत लंगडत पारधी होता त्या रस्त्यानेच येऊ लागले !

पारधी त्या लंगडोबाला पाहून खदखदा हसला अन् म्हणाला–

"ठीक ठीक ! सांबऱ्या, तू जाळं तोडून निसटलास एकदा माझ्या हातून– पण पुन्हा हातांतून नाही जाऊ देणार तुला मी. तुझ्या पायाला पळताना जखम झाली– छान झालं ! आलोच हा तुला पकडायला मी. दोन्ही हातांनी ही तुझी अफाट पसरलेली शिंगेच पकडतो– मग पाहू या कसा सुटतोस ते."

पारध्याने हातातली सरकफासाची पिशवी जमिनीवर ठेवली व तो धावला. पण अरेरे ! हातचे सोडून पळत्याच्या मागे लागण्याचा मूर्खपणाच त्याने केला. तो जवळ दिसताच सांबर ताडकन् उठले ते चौखूर उड्या घेत रानात दिसेनासे झाले. इकडे पारधी त्याला शिव्या देत परत फिरला तर कावळ्याने पिशवीचे बंद तोंडात धरून ती उचलली व कावळा भुर्रर्र उडून गेला !

हेही गेले व तेही गेलें अशी पारध्याची अवस्था झाली होती !

परत त्या सायंकाळी तळ्यावर तिघे शेजारी मजेत गोष्टी बोलत बसले होते. ते दोघं कावळ्याला म्हणाले–


"कावळाप्पा, तुमच्यासारखा युक्तिमान मित्र होता– म्हणून आम्ही वाचलो दोघं. तुमचे किती उपकार–"

"जाऊ द्या, तसलं बोलणं कशाला ? मित्रांत उपकाराची भाषा नको बाबा. मी एक सुचवणार आहे. आपण रानातल्या त्या पारध्याच्या वाटेवरून यापुढे जा ये करायची नाही ! दुसरी पायवाट शोधून काढा ! अगदी नवीच तयार करा ना ?"

कासव म्हणाले– "उद्याच मी तेथल्या साफसफाईला जाऊन नवी पायवाट तयार करतो !"

अन् मग या वाटेत त्यांच्याजवळ कधी शिकारी वा पारधी फिरकलादेखील नाही, ते सुखी झाले !

७८५८ ११.३.
बा.वा.



# ५. कासवांनी केली गम्मत

कासव तुम्ही पाहिलेच असेल ? किती हळूहळू चालते, जरा धक्का लागला की, ते पाठीखाली डोके ओढून घेते. किती गरीब वाटते, नाही ? पण खरे तर कासव असे गरीब नाही; ते खटचाळ, खोडकर असेही असते पुष्कळदा, हे आहे का माहीत ? पहा ना या दोन कासवांनी कशी गम्मत केली एका शक्तिमान हिप्पोपोटेमसची ते !

त्या मोठ्या नदीच्या जवळच दोन एकसारखी कासवे रहायची. ते जुळे भाऊच होते, अगदी सारखेच दिसायचे. याच्या पाठीवर नक्षी तशी त्याच्याही पाठीवर तशीच, एकाचा आकार जेवढा, तेवढाच दुसऱ्याचा. रंगरूप अगदी तस्सेच ! या सारखेपणाने रानातले पशु फसायचे. गाय आपली गरीब. ती यांतला एकजण दिसला की विचारायची—

" काय रे कासवभाऊ, काल मला भेटलास तो तू, का तुझा हा भाऊ रे ?"

मग एक कासव म्हणे–" मीच भेटलो होतो गाईमाई तुम्हाला."

मग दुसरा म्हणे– " नाही, हा खोटं बोलतोय. हा नाही, मी भेटलो."

मग गाय गोंधळून जायची अगदी– अन् मागून हे दोघं खूप तिला हसायचे ! " कशी केली गम्मत ?"

पण एक दिवस त्यांतले एक कासव म्हणाले–

" दादा, गाय बिचारी भोळसर गरीब. ती फसली तर नवल नाही. पण आपण या आपल्या सारखेपणाच्या उपायाने एकाद्या ताकदवान प्राण्याची भंबेरी उडवून दिली तर खरी गम्मत !"

" हो रे हो, अगदी खरं तुझं भाऊ. पण कोण असा सशक्त प्राणी ? त्यातही आपल्यासारख्यांना उगीच त्रास देणारा कुणी असेल तर आधी त्याची फजिती करायची. ठरलं ! कोण असे मोठे प्राणी ?"

" सर्वांत मला राग येतो तो त्या लठ्ठंभारती हिप्पोपोटेमसचा. रोज सारखा नदीत डुंबतो अन् सारं पाणी गढूळ घाणेरडं करून टाकत असतो तो. नदी आमचीपण आहे, हेसुद्धा त्याच्या लक्षात येत नाही बघ दादा. त्याची खोड मोडू या एकदा."

" अरे, अरे भाऊ, हिप्पोदादासारख्या खूप मोठ्या हत्तीसारख्या जडजाड पशूची आपण लहान लोक कशी खोड मोडणार ? एका पायाने तो आपल्याला चेंगरून मारील म्हटलं ! तो केवढा, आपण केवढे ? काही विचार ?"

"सगळा विचार केला आहे मी दादा, छान युक्ती सुचली आहे मला. हिप्पोची मजा करायची."

मग ते अगदी हळू आवाजात बोलू लागले व ती छानदार युक्ती त्यांनी नीट समजून घेऊन पक्की केली. दोघांनी मिळूनच ती युक्ती पार पाडायची होती.

दुसरे दिवशी सकाळीच हिप्पोचे प्रचंड धूड तेथे आले, नदीत उतरले व हलकेहलके पोहत काठाशी आले. जुळ्या भावातला मोठा भाऊ काठाशी होता व दुसरा धाकटा भाऊ पलीकडच्या तीरावर केव्हा पहाटेच जाऊन लपून बसला होता. मोठा कासव दादा म्हणाला–

" हिप्पोदादा, हे कसलं पोहणं ? गोगलगायीसारखं, किती हळू-हळू ? एवढे मोठे तुम्ही, चपळपणा कसा नाही तुम्हाला ? मीच तुमच्यापेक्षा जलद पोहतो व छान ऐटीत पोहतो ! असं पाणी ढवळून नाही टाकीत सारं. तुम्ही जडभरत आहात बुवा !"

हिप्पोला राग आला. कोण बोलतंय हे उर्मटपणाने ? तो वाकून पाहू लागला तर एक कासव ! तो रागाने म्हणाला–

" चूप बैस, आमच्यासारख्या मोठ्यांची तू क्षुद्र प्राणी चेष्टा करतोस ? मुलखाचा तर हळुबुवा आहेस तू– अन् म्हणे मी जास्त चांगलं जलद पोहतो."

कासव म्हणाले–

" तुमची चूक होतेय दादा. लहानांना कोणतीच कला नीट येत नाही, असं कसं म्हणता तुम्ही ? म्हणे मी हळुबुवा ! कोण म्हणतं ? अहो तुम्हालासुद्धा मी मागे टाकीन पोहण्याच्या शर्यतीत–"

" खोटं !"

"खोटं नाही, खरं. लावा शर्यत– पैजेची. मी जिंकलो तर या नदीवर तुम्ही पोहायला परत यायचं नाही ! तुम्ही जिंकलात तर मी हा देश सोडून जाईन ? कबूल ?"

"अरे मूर्खा ! तुझ्याशी कसली वरोबरीची शर्यत ? जा आपल्या वाटेनं कसा ?"

"आँ ? भिता वाटतं शर्यतीला ? हराल याचं भय वाटतं ना ?"

कासवाने चिडवले, हिणवले, तशी हिप्पो खरोखरच रागावून म्हणाला– "तुला कोण भितंय ? चल, लाव शर्यत ! कुठपर्यंतची? नदीतून किती चार मैल जायचं असेल तरी आपली तयारी आहे–"

"छेछेछे ! हिप्पोदादा, आपली शर्यत हा एक खेळ. खेळाचा इतका त्रास मी गरिबानं तुम्हासारख्यांना होऊ देणं बरं नव्हे. ते पलीकडचं नदीतीर दिसतं ना दूर ? बस्, तेथे आधी कोण पोहोचतो ते बघायचं, खेळ खलास !"

"चल तर ! तू हरणार कासव्या !"

"पाहू पाहू, काय निकाल लागतो तो. एक दोन तीन ! शर्यत सुरू सुरू सुरू !"

दोघेही पाण्यात पोहू लागले. हिप्पो वेगाने पोहत चालला. आपला कासवदादा मनात हसला व पूर्वी ठरल्याप्रमाणे पाण्यात थोडेसे पोहत जाऊन त्याने खोल पाण्यात बुडी मारली व हिप्पोचे लक्ष नाही हे पाहून तो परत याच तीरावर येऊन बसला.

तिकडे जुळे धाकटे कासव हिप्पोवर लक्ष ठेवून लपून बसलेच होते समोरच्या तीरावर ! हिप्पो जवळ येतोय हे पाहताच धाकटा भाऊ तीर सोडून पाण्यात उतरला, थोडा पोहत अलीकडे आला व मग परत त्या पलीकडच्या तीराकडे वळून पोहू लागला. हिप्पो

दमून पोहत पलीकडच्या तीराशी येतो तर काय ? कासवभाऊ (धाकटे कासव) त्याच्या पुढेच नदीतीर चढून बसत होते–ह्याने शर्यत जिंकली की काय ? आलं केव्हा हे इकडे ? इतक्या जलदीनें मी आलो तरी या जड हळुबुवाने माझ्यापुढे पोहण्यात मजल मारली ? कमाल आहे !"

हिप्पो तीरावर पोचताच धाकटे कासव विजयी आवाजात म्हणाले– "हरलात ना हिप्पोदादा ?"

"हरलो खरा ! तुला इतक्या वेगाने पोहता येते, कल्पना नव्हती कासवभाऊ."

"कसचं, कसचं आपलं ? पण पैज हरलात तुम्ही तेव्हा–"

"कबूल. मी शब्द पाळणारा आहे. उद्यापासून मी त्या दुसऱ्या रानातल्या नदीवर जात जाईन स्नानाला !"

"नमस्ते कासवदादा–" तो वेगाने निघून गेला तेथून.

अन् खरेच, हिप्पो परत नदीचे पाणी गढूळ करायला कधी आला नाही. दोन्ही कासवबंधू हसत मजेनं म्हणत होते–

"चला, पीडा टळली ! कसं फसवलं हिप्पोला ? नुस्ता देह मोठा ! बुद्धी अगदी वाटाण्याएवढीच."



## ९. बड्यांची रस्सीखेच !

ते बेट अगदी छोटेसे होते. खरे तर जास्त प्राणी रहायला तेथे जागाच नव्हती. तरी पण एक हत्ती, एक हिप्पोपोटेमस व या दोघा बड्यांपुढे आणखीनच लहानसा दिसणारा ससा ! बस्. तेथे बेटावर हे तीनच रहिवासी ! पैकी बेटांच्या पूर्व बाजूला हत्ती राहायचा तेथे केळीचे बन होते. पश्चिम बाजूला हिप्पो आरामात राहायचा. या दोघांची आपसात ओळखही नव्हती. ससा एकटाच छोटुला प्राणी तेथे. तो दोघांकडेही जाई, गप्पा कराव्यात, बोलावं, थोडावेळ मजेत काढावा म्हणून ! पण काय विचारता ? ते दोघेही त्याला अगदी क्षुद्र समजत असत व नोकरासारखी धावपळीची कामं सांगत. हत्ती म्हणायचा–

" ससुल्या, नदीतून पोहत जा जमिनीवर अन् माझा मुलगा आता मोठा झाला असेल, त्याला सांग म्हणावं, इथं खूप जागा आहे. इकडे या रहायला. बघ, मी तुला नारळ फोडून देईन रोज

दोन-चार !!

सशाला राग यायचा. तो होय म्हणायचा पण ते काम तो कधीच करायचा नाही. मी का म्हणून या प्रचंड हत्तीची कामं करू ? मी काय यांचा नोकर थोडाच ? मग काही दिवसांनी हत्तीला भेटून तो म्हणे– " येताहेत ते लौकरच."

बरं, हिप्पोकडे तीच तऱ्हा. सशाला मैत्री हवी होती, हुकूम देणारा मालक नको होता. हिप्पो म्हणायचा–

" छोटुल्या सशा, माझं एक काम कर. या बाजूने पोहत जा. माझं लग्न ठरलं आहे– बायको खूप नाजूक सुरेख आहे– तिला म्हणावं, तुला भेटायला बोलावलंय या सुंदर बेटावर–"

आपले हसू लपवताना भारी तिरपीट उडायची सशाची. हिप्पो-दादाची बायको म्हणजे दुसरा काळा ढगच की. अन् तसाच प्रचंड आकार– त्याच्यासारखाच. अन् ही म्हणे नाजूक. हिप्पो अन् सुंदर ? अहाहारे यांचा सुंदरपणा !

तो हसू लपवीत म्हणे–

" जाईन हिप्पोदादा. काळजी नको."

पण मनात म्हणे– " मी का इतक्या दूर जाऊन त्या कुठल्या हिप्पीणीला बोलावून आणायचं ? याला छान पोहता येतं. हाच जाऊन का भेटून येत नाही त्यापेक्षा ? मी काय याचा चाकर आहे अशी रिकामी धावपळ करायला ? की याचा दूत आहे निरोप पोचवायला ? नाही जात जा !"

मग चार दिवसांनी जाऊन म्हणे– " हिप्पोदादा, त्या हिप्पो-सुंदरी म्हणाल्या, लग्न झाल्यावर मी येईन, आधी नाही."

पण हा– सशाला तुच्छतेने वागवण्याचा प्रकार नेहमीच घडू लागला. बरे, या थोर मंडळीकडे जाऊ नये म्हणावं, तर

बेटावर इनमिनतीन प्राणी ! वेळ जायला शेजाऱ्यांशी गप्पागोष्टी कराव्याशा वाटणारच प्रत्येकाला. निदान सशाला तरी कराव्याशा वाटायच्या. पण त्याला हे दोन्ही शेजारी मित्र म्हणून हवे होते– हुकूम करणारे मालक म्हणून नकोच होते ! पण ते दोघं कधीच स्नेही म्हणून त्याच्याशी बोलत नसत– सदा आढचता, आपल्या मोठेपणाचा गर्व, शक्तीचा प्रचंड अभिमान. नेहमीच बोलण्याचा हाच विषय ! कोण सहन करून घेणार हे ? सशाला खूप राग यायला लागला व त्याने दोघांचीही खोड मोडायचा निश्चय केला. खोड मोडायची– पण कशी ? ते केवढाले, हा केवढा ?

ससा फार चपळ असतो, तेवढाच चतुरही असतोच की. त्याला लौकरच एक छान युक्ती सुचली– युक्ती पण युक्ती होती. " बस्स, ठरले. असेच करतो !"

तो मनाशी म्हणाला–

त्या रानात मध्यभागी एक प्रचंड झाड होते. त्याच्यावर कितीतरी चिवट वेली चढल्या होत्या. तुटता तुटू नयेत अशा चिवट. त्या काढून त्याने त्यांची एक मजबूत दोरी वळली. इतकी लांब की बेटाच्या पूर्वेपासून पश्चिम तटापर्यंत ती सहज पोचेल ! मग त्या दोरीचे एक टोक दातात धरून प्रथम तो हत्तीकडे गेला. हत्ती म्हणाला–

" पोरट्या, बरा आलास. मुलाचा निरोप आला आहे, त्याला मुलगा झाला आहे. तू जाऊन सांग मुलाला. की नातवाला या बेटावर पाठव मला भेटायला ! कसं ? सांगशील ?"

" अहो, पण तुम्ही अशी कामं मला का सांगता बाबा नेहमी ? मी साधं भेटायला येतो– मित्र म्हणून–"

" कोण मित्र ? तू ! अरे हुडुत् ! मोठ्याचे मित्र मोठेच

असतात छोटया. तू तर एक चिटुकला क्षुद्र जीव– तुझ्याशी मैत्री करू ? छे, भलतीच हसायसारखी गोष्ट."

"हत्तीबाबा, मी क्षुद्र नाही. तुमच्याइतकीच ताकद मला आहे म्हटलं ! सांगा आपल्या दोघात ताकद कुणाची जास्त ?"

"केवढा मूर्खपणाचा प्रश्न ? कमाल आहे. अरे, माझी ताकद कितीतरी पट तुझ्याहून जास्त. एक पाय तुझ्यावर दिला तर तुझा निकाल लागेल ससुरड्या."

"असा निकाल काय उपयोगाचा ? जास्त शक्तिमान कोण याचा निकाल लावायला एक झकास उपाय आहे. आपण रस्सीखेच करू दोघं– मग ठरवू."

"तुझी माझी रस्सीखेच ? वेड्या, मीच जिंकणार यात काय शंका ? पण चल, मी तयार आहे. तुझी तरी खात्री होऊ दे माझ्या शक्तीबद्दल."

"मग बाबा, या दोरीचं एक टोक तुम्ही पायाला घट्ट घट्ट बांधा बघू ? मी दुसरे टोक दूर जाऊन पकडतो. लक्षात ठेवा, मी तीन हिसके दिल्यावाचून ओढायचं नाही. खेळाचे सारे नियम पाळायला हवेत, तर तो खेळ."

"ठीक आहे. तू दोरी हलव तीनदा अन् धडकून आपटण्याची अन् फरपटण्याचीही मनात तयारी ठेव, खुळ्या."

"बघू बघू– खेळात हारजीत कुणाची होते ते !"

मग दोरीचे दुसरे टोक दातात धरून ससा उड्या मारीत दुसऱ्या टोकाला गेला. हिप्पोदादा नदीत डुंबत होते. सशाने विचारले–

"हिप्पोदादा, आपल्या दोघांत जास्त ताकदवान कोण ?"

हिप्पो आपला मोठ्ठा लालभडक जबडा उघडून म्हणाला–

"अर्थात् मी– मीच, यात शंका कसली चिमण्या सशा ? अरे, मनात आलं तर तुला सबंध गिळून टाकीन मी एका घासात. पण मी चांगला आहे– तू मला आवडतोस. मी नाही खाणार तुला. आज तू परत हिप्पीणीकडे जाऊन ये छोटुल्या– म्हणावं–"

"थांब. दादा, आपल्या बरोबरीच्या मित्राला कुणी अशी कामं सांगत नाही एकसारखी."

"अरे पण तू कुठे ? मी कुठे ? आपली कुठली बरोबरी, बाळ ?"

"पण मी बाळ नाही ! तुमच्याहून ताकदवान आहे दादा मी."

हाऽ हाऽ करून हिप्पो जबडा उघडून हसला, म्हणाला–

"काय ? तुझी ताकद माझ्याहून जास्त ? भले शाबास, कोण म्हणतं ?"

"म्हणायला कशाला हवं कुणी ? प्रत्यक्ष परीक्षाच देऊ की आपण शक्तीची दोघं, त्यात निश्चित कळेल कोण जास्त ताकदीचा ते– आपण रस्सीखेच खेळ करू. जो दुसऱ्याला ताकदीने ओढून घेईल तो जास्त ताकदवान्–"

"अरं जा जा, तुझ्याशी कसली रस्सीखेच, वेड्या ?"

"हेच ते ! मला वेडा, छोटू, बाळू म्हणता, म्हणूनच एकदा ही परीक्षा होऊ द्या."

"बरं बाबा, काय करायचं ते सांग–"

सशाने रस्सीखेच हा खेळ हिप्पोला समजावून दिला. दोरीचे दुसरे टोक हिप्पोच्या भल्या पाठीपोटाला घट्ट बांधले, मग तो म्हणाला– "मी दुसऱ्या टोकाला जातो, तीनदा दोरीला हिसका देतो. मग ओढाओढ सुरू करायची, बरं का."

आणि ती भयानक रस्सीखेच सुरू झाली! हत्ती व हिप्पोपोटेमस– सारख्याच ताकदीचे. दोघेही दोन बाजूला ती दोरी जीव खाऊन ओढीत होते. पण कुणीच हार खाईना. एकदा हत्ती फरपटत गेला व आपटला तर दुसऱ्यांदा हिप्पो जमिनीवर आदळला! धाड, घडधड धाड् आवाज उठले. ते सारे बेट हादरले. दोन घटका ही चढाओढ चालली होती. अखेर त्या चतुर सशाने 'ही गंमत पुरे आता' म्हणून मध्यावर जाऊन दोरी तोडून टाकली व दोन्ही बाजूचे ते दोन राक्षसी शक्तीचे जोडीदार धाडदिशी आपटले! इतक्या जोराने की चार दिवस ते आजारी होते. छान मस्ती जिरली होती त्यांची– मनात दोघेही म्हणत होते– "तो ससा एवढासा पण, असा शक्तिमान कसा? कोण जाणे. कल्पना नव्हती."

अन् ससा? तो मनात म्हणत होता– शक्तीपेक्षाही कधीकधी युक्ती वरिष्ठ असते हे त्या दोघा बड्यांना आता नीट कळले असेल!

# ७. पाठ फुटली– ऐट मिटली

त्या मोठ्या तलावाच्या आत जसे अनेक सुंदर रंगारूपाचे मासे राहात होते तसेच बाहेर जवळच्या झाडाझुडांवर अनेक पक्षी घरे करून राहायचे. आणि पाण्यातही ज्यांना पोहता-राहता येतं व जमिनीवरही जे हिंडू शकतात, असे मोठमोठे खेकडे, कासवे व सुसर इत्यादी प्राणीही तिथे काही होते.

या सर्वांत एक भले मोठे कासव होते. खरं म्हणजे कासव हा गरीब, निरुपद्रवी प्राणी म्हणतात. एका अर्थी खरंच ते, ते फारसे कोणाला मारून खात नाही– पण दुसरा एक या मोठ्या कासवाचा उपद्रव होता– तो म्हणजे ज्याला त्याला ते ऐट दाखवून हिण-वायचे ! पुष्कळजण ऐट करतात– कोणी श्रीमंतीची, कोणी हुशारीची, कुणी आपल्या रूपाचीसुद्धा– नाही असं थोडंच ? पण कासवाच्या अंगी यांपैकी काहीही ऐट करण्यासारखं नव्हतं, तरी

ते तोऱ्याने बोलायचे. कशाबद्दल ? तर आपल्या टणटणीत व टणक पाठीबद्दल ! आपल्या अंगच्या गुणाचा कोणाकोणाला गर्व असतो खरा, पण तो बेताचा असला तर बरा, उगीच येताजाता

माझी नक्षीची पाठ !
रांगोळी सुदर दाट !
पहा पहा माझा थाट !
तुम्हाला आहे का अशी पाठ ?

असे गुणगुणत प्रत्येकाला हिणवायचे व चिडवायचे कासव. त्या रानातले सगळेजण त्याच्या त्याच त्याच 'संगीताने' अगदी कंटाळून गेले होते. कासव म्हणे–

"ऐका, मीच साऱ्यांत देवाचा लाडका. देवळात जाऊन बघा हवंतर देवासमोर तुम्हाला माझंच चित्र दिसेल दगडी, खोदलेलं! जशी देवाची मूर्ती तशीच माझी मूर्ती तिथं असते. तुमची असते का कुणाची मूर्ती देवळात ? मी तुमच्या साऱ्यांत महत्त्वाचा आहे हे यावरून तरी ओळखा की." कधी ते म्हणायचे–

"पक्ष्यांनो, माशांनो, देवाचा मीच लाडका ! त्यानं माझा अवतार घेतला होता व त्याच वेळी ही सुरेख गुळगुळीत पण मजबूत पाठ मला दिली देवाने. तुम्हाला कुठं आहे असली पाठ ? हुडूत् !" यावर बापडे पक्षी काय बोलणार ? एकदा हे शब्द एका खूप मोठ्या माशाने ऐकले. तो काठाशी आला व म्हणाला–

"देवाने तुझा अवतार घेतला यात काय मोठं झालंय रे मूर्खा ? तुझ्या आधी माझा अवतार घेतला होता श्रीविष्णूंनी, पण मी कधी त्याची फुशारकी मारीत बसलो नाही अशी. देवाला सज्जनांचं रक्षण करण्यासाठी पुष्कळच अवतार घ्यावे लागले आहेत, असे. त्याबद्दल तू रिकामी ऐट मारणं शोभत नाही तुला. मी करतो

का असं ऐटीचं बोलणं ?"

"ऊं ! तू कशाची ऐट मारणार ढब्बू माशा ? आमच्याप्रमाणे तुला पाण्याबाहेर सुद्धा हिंडता फिरता येत नाही उलट, अन् देवानं मला एवढी सुंदर पाठ दिली– नक्षी पाठीवर कोरली ! तुला काय दिलंय ? अवतार घेतला तुझा, खरी गोष्ट– पण फुकट. हातपायसुद्धा दिले नाहीत वरदान म्हणून. भिकारडा कुठला. चल जा. अरे या कूर्मराजासमोर उभं राहायलासुद्धा पाय नाहीत की रे तुला ? अरेरेरेऽ ! काय ही दुर्दशा ? श्रीहरी– श्रीहरी !" अन् कासव कुचेष्टेने माशाला खूप हसलेदेखील.

मासा संतापाने म्हणाला–

"कां ? तुला दिसत नसलं तरी देवानं आमच्या अंगावर इंद्रधनुष्याचे सगळे रंग दिले आहेत व आमची ऐटबाज डौलदार शेपटे पाहात नाहीस का ? किती नक्षीची, किती सुबक असतात ती ? देवाने प्रत्येकाला काही चांगले गुण दिले आहेत बाबा. तुझीच ऐट कशाला ?"

कासव तुच्छतेने म्हणाले– "जा मासोड्या, माझी धरणीवर फिरायची वेळ झाली– हवं तर ये जमिनीवर संथपणे बोलायला. आहे का ताकद धरतीवर चाल करायची ? माझी पाठ उन्हात कशी चमकते एकदा, लठ्ठोबा तुम्ही बघा वर येऊन– हीहीही... खिः खिः खिः"

या अपमानाने मासा कंटाळून परत फिरला. पण एकदा या गर्विष्ठ कासवाला चांगली अद्दल घडवायला हवी, असे त्याने ठरवले आणि त्याची एक युक्तीही शोधून काढली छानशी.

एक मोठा गरुड पाणी प्यायला तलावावर आला. तो माशाचा मित्र होता. गरुडाला माशाने कासवाची कटकट सांगितली व

आपला अपमान त्याने कसा केला हेही सांगितले.

गरुड पक्ष्यांचा राजा, तो म्हणाला–

"आम्ही राजे पक्ष्यांचे; जमिनीवरच्या प्राण्याची अगर जलचरांची भांडणं नेहमी चालतात, त्यात मी कधीच मन घालीत नाही. तरीपण एकाद्याला शिक्षा द्यायला मला ताकद आहे. बघू, मी एकदा ऐकतो त्याचं बोलणं– मग मी ठरवीन काय ते."

आणि खरेच, ते वडे कासव नेहमी जिथे पक्ष्यांत प्राण्यांत येऊन वडबड करायचे, तिथेच त्या मोठ्या वृक्षावर गरुड विश्रांतीसाठी येऊन बसू लागला रोज. त्या जागी राहाणारे पक्षी प्रत्यक्ष राजे गरुड आपल्या घराजवळ का येऊन बसतात, याबद्दल भयभीत झाले. आम्ही कुणी तर काही अपराध केला नाही कुणाचा. एकमेकांना मदत करतो, गोडीगुलाबीनं वागतो सगळ्यांशी. मग राजे का इथे रोज येतात ? अन् गुपचूप का बसून कासवाचे ते कंटाळवाणे व्याख्यान, ती ऐटीची बोलणी ऐकतात रोजरोज ?

कासवाला ह्याची कल्पना नव्हती. पक्ष्यांसमोरही त्याची ऐट मिरवणे चालूच. ते तऱ्हेतऱ्हेने गर्विष्ठपणे रोज सांगायचे–

"पक्ष्यांनो, बघा माझी ही दिव्य पाठ ! अहा किती नक्षी कोरलेली ? किती गुळगुळीत अन् तरी टणक ? माझं ते कवच आहे कवच, रक्षणाचं. मी त्याखाली डोकं ओढून घेतो. मग कुणाचं भय नाही बुवा वाटत. तुम्हाला कुठे आहे कवच असं ? बोला, आता का गप्प ? कुठे गेली तुमची किलबिल ?"

मोर म्हणे– "अरे, एक कवचच तेवढं जगात छान असतं का ? माझा पिसारा बघ एकदा. तोही देवानंच दिलाय मला. शंभर डोळे अन् तेही रंगीत रंगवलेत देवानं. पण तू दोन डोळ्यांनी किती किती पाहाशील ? बस् झाला तुझ्या त्या पाठीचा पाठ.

कंटाळा आलाय रोज तेच ऐकून."

"येणारच, येणारच कंटाळा ! दुसऱ्याचे गुण कोणाला पाहवत नाहीत– ऐकवतही नाहीत पुष्कळांना." कासव बोलून दाखवी.

कोकीळा म्हणे– "कासवभाऊ, मी लहानशी, पण तरीही देव मला देणगी द्यायला विसरला नाही वरं का. मला त्यानं किती सुंदर आवाज दिला आहे ऐकतोस ना ? पण असं त्याबद्दल सारखं बोलून मी दुसऱ्याला हिणवते का ? खरं म्हणजे गाणी मी पाठ करते– पण सारे तुलाच 'पाठक' म्हणू लागले आहेत, या पाठीच्या बोलण्याने ! जाऊ दे, दुसरं बोल आता. आमच्या पाठी लागू नको 'पाठ माझी छान पाठ' करून."

पोपट म्हणाला– "तुम्हाला देवाने एकटयालाच देणगी दिली असं नव्हे भाऊ. मला माणसाची वाचा दिली नाही का ? सदा विडा खाल्ल्यासारखी लालबुंद चोच दिलीय, मनोहर रंग दिला आहे. प्रत्येकाला देवानं काही ना देणगी दिलेली आहेच; तुम्हीच काही त्याचे एकटे लाडके नाही, तेव्हा आता पाठीच्या बोलण्याचा पाठ गिरवू नका– ऐट मिरवू नका."

कासव हट्टाने म्हणाला– मी ऐट मिरवणार. तुम्ही मत्सरी आहात. मी सुंदर पाठीचा. प्रत्यक्ष तुमच्या राजालाही असली पाठ नाही– तर तुम्हाला कुठली ! ! तुमचे ते 'गरुड राजे' असले तरी माणसाने मारलेल्या बाणाने सहजच त्याची पाठ फुटते– माझ्या पाठीवर बाणच बोथट होतात म्हटलं– त्यांच्याहून मीच श्रेष्ठ आहे– सुंदर पाठीचा प्राणी म्हणून !"

सर्व पक्षी भिऊन उडालेच, प्रत्यक्ष राजांचा अपमान ? अन् हे बोलणे राजे ऐकताहेत ? आता काय होणार याचं कोण जाणे !

गरुड झटकन् खाली उतरला. अन् त्याच्या समोर येऊन

आपल्या लालबुंद माणकासारख्या डोळ्यांनी कासवाकडे पाहू लागला व म्हणाला–

"नमस्ते कूर्मराज. सहज भेटीला आलो. म्हटलं, तुमची पाठ एकदा जवळून बघावी. वरती झाडावरच होतो, तुम्ही माझं नाव काढलंत. माझं नाव काढणाराला मीही शिक्षा करतो नेहमी– विसरलात की काय ?"

चटकन् डोके पाठीच्या आत ओढून घेत कासव भिऊन म्हणाले, "क्षमा असावी राजे. मी नावं ठेवत नव्हतो तुम्हाला. खरं खरं ते बोलत होतो."

"खरं खरं म्हणजे– मला सुंदर मजबूत पाठ देवानं दिली नाही– हेच ना ? खरं आहे. पण देवाने मला अफाट ताकद दिली आहे. तुमच्यासारखी दहा कासवं पंज्यात पकडून आकाशातून भराऱ्या घेऊ शकेन. अशी गरुडझेप तुम्हाला आहे का ? की अशी ताकद आहे ? उगीच हे गर्वाचे बोलणे सोडून द्या. मी कधी ऐटीनं बोलत नाही असं."

कासव खूष झाले. हळूच म्हणाले–

"आपण श्रेष्ठ, मीही तुमच्याइतकाच श्रेष्ठ. आपण मित्र होऊ या बरोबरीचे. माझी एक इच्छा पुरी कराल कृपा करून."

"आज्ञा करा कूर्मराज. जमेल तर बघू. मित्राची आज्ञा–"

"आज्ञा नाही– विनंती. मला एकदा आकाशातून हिंडवून आणाल ? उंचावरून समुद्र, धरती, डोंगर, शेते कशी दिसतात ? ते फार दिवस बघायचं आहे हो, मनात. मी गरीब– कसा उडणार आकाशात ?

खरेच. गरुड थोर मनाचा होता. या मूर्खाला कशाला शिक्षा करायची आपल्यासारख्याने ? तो शांतपणे म्हणाला–

" ठीक आहे– एक अट."

" बोला अट. मी सगळ्या अटी पाळीन–"

" ठीक. मी नेऊन आणतो गगनातून, त्यात काय मोठं ? पण तुम्ही प्रवासात मध्ये बोलायचं नाही. माशाप्रमाणे मूक बसायचं पाठीवर. नाहीतर माझं लक्ष मुळीच राहात नाही उडण्यात. तुम्ही पडाल ! गप्पा नाही, गर्वाची बोलणी नाहीत– मुळीच नाही. धोका आहे तुम्हालाच त्यात ! गुपचूप चूपचाप बसून राहायचं मी खाली सोडीन तोवर. पण नकोच, तुम्हाला राहावणार नाही. पट्टीचे बोलके तुम्ही. राहू द्या सारं."

" नाही नाही. मी मुळीच बोलणार नाही. मधेमध्ये, आपल्या श्रीविष्णूंची शपथ."

" हं, ठीक. पाठीबद्दलचे पुराणही बोलायचे नाही. कंटाळवणे आहे ते–"

" कबूल कबूल. एकदाच मला फिरायला घेऊन चला राजे."

अन् केवढे आश्चर्य ! त्या थोर मनाच्या राजाने त्या क्षुद्र कासवाला पाठीवर घेऊन आकाशात भरारी घेतली. थोडा वेळ कासव गप्प होते– पण जसजसे पृथ्वीचे मनोहर रूप आकाशातून दिसू लागले, तसतसे त्याला राहवेना. बडबड्या प्राण्याला बडबड केल्यावाचून कुठे राहावते ? ते म्हणाले–

" अहाहा, केवढे सुंदर रूप धरतीचे हे ? वावावा, काय भव्य हा समुद्र ? किती निळा निळा, ओहोहो, ही बाग म्हणजे पृथ्वी-वरचे नंदनवनच तर नाही ना ? छान छान. देवाने गरुडराज तुम्हाला माझ्याहून मोठी देणगी दिलीय उंच गगनझेप घेण्याची ! माझ्या पाठीपेक्षा श्रेष्ठ देणगी. अहो गरुडराजे–राजे– राजे– बघा ना–"

जोराची हाक ऐकून गरुडाने मान वळवून पाहिले व काय ? बाप रे, गरुड थोडा कलता झाला त्याला नकळत– अन् धडाड् धप्प् ! थाड् थाड् थाड् ! कासवाची बापड्याची पकड निसटलीच एकदम ! आपटचा घेत उंचावरून कासव आदळले ते नेमके त्याच तलावाच्या काठी अन् तेही पाठीवर आदळले. त्याची ती कठीण पाठ इतक्या उंचावरून आदळल्याचे पिचली, फुटली, तिचे कित्येक तुकडे झाले व कासव बेशुद्ध झाले– ते वाचले हेच विशेष.

गरुड खेदाने म्हणाला–

" पक्ष्यांनो, याने जातानाही बडबड केल्याने हा घसरला एकदम. माझा हा दोष नव्हे. पण तुम्ही सारे आता त्यावर उपचार करा चांगले. मी शिंपीण पक्षिणीला पाठवतो. ती छानदार शिवणकाम करील जखमेचे. सुतारपक्ष्यालाही पाठवतो. तो पाठ नीट बसवून देईल कासवाची... ध्यानात घ्या. मी त्याला शिक्षा केली नाहीये, देवाने केली– किंवा त्याच्या ऐटीच्या बोलण्यानेच त्याला अपाय झाला. चला, सगळे शुश्रुषेला लागा त्या गरिबाच्या. पोपट, तू ही फळे फोडून त्याचा रस त्याला पाज, तो शुद्धीवर येईल. चला."

तो दयाळू राजा मग तेथून उडून गेला.

बिचाऱ्या कासवाच्या पाठीचे दहा-वीस तुकडे झाले होते, सुतारपक्ष्याने आपल्या तीक्ष्ण चोचीने ते नीट एकत्र जुळवले व शिंपीण पक्षिणीने त्या तुकड्यांना बेमालूम टाके घालून शिवले.

छान शिवले. किती नाजूक शिवणी होत्या साऱ्या. खरेच तिला शिवणकाम फार चांगले येत होते. नेहमी ती पानांचे घरटे किती सुबक टाके घालूनच करीत असे.

मग सर्व ताकदवान पक्ष्यांना कावळ्याने बोलावून आणले, घार, गिधाड, ससाणा व मग बारके सर्व पक्षी. सर्वांनी मिळून ती

पाठ उचलून कासवाच्या अंगावर झाकली. बाया पक्षिणीने ओल्या मातीने ती चिकटवली व मग फिरून शिंपीणीने तेथेही टाके घालून ती जोडून दिली ! कासव सावध झाले होते आता.

हा सगळा प्रकार नदीकाठावरच चाललेला. पूर्वीचा तो मासा वर डोके काढून पहात होता सारे... तो म्हणाला–

" आँ ? कासवाची पाठ खाली जमिनीवर ? गर्वाचे घर खाली म्हणतात ते हेच बहुतेक ! बरं झालं, पाठ फुटली– ऐट मिटली, या हळूरावांची–

पक्षी म्हणाले– " जाऊ द्या मासेराव, यावेळी बोलू नका असलं."

कासव डोकं वर उचलीत म्हणाले– " माशा, तुझी मी क्षमा मागतो. आता मी कधी ऐट मिरवणार नाही पाठीची. देवानं मला शिक्षा केलीय !"

अजूनही कासवाच्या पाठीला शिवणीचे जोड दिसतात व अनेक तुकडे जोडलेल्या गोधडीसारखी त्याची पाठ दिसते– अर्थात ती नक्षी तशी आहेच पाठीवर, पण त्यातूनही शिवणी दिसतातच, पाहता ना ?

BVBK-0401959